# वर्ष १९९२

## बबन्याचे जीवनकाव्य

बांगरवाडी मोठं टुमदार गाव! बबन्या गवते त्याला भंगारवाडी म्हणत असे, त्यालाही रास्त कारण होते. तसे पाहिले तर बबन्यासारख्या भावी महान कवी या छोट्याशा गावाबद्दल काही म्हणणे, म्हणजे गावाला उगाचच मोठेपणा देण्यासारखे होते. बबन्या स्वतःला भावी महान कवी म्हणवून घेत असला, तरी प्रत्यक्षात तो आत्ताच महान होता, यात शंका नव्हती. अर्थात हे गुपित त्याने स्वतःपुरतेच ठेवले होते. खरे तर आपल्याच एका लघुकवितेत त्यांने हे गुपितही उघड केले होते. बबन्या त्या लघुकवितेत म्हणतो,

गावात माझ्या किती पाऊलवाटा

- साऱ्या खोट्या ||

मी एकटाची हमरस्ता

-जरी फुफाट्या ||

या कवितेचं साहित्यिक मूल्य कळण्याएवढं रसिक डोकं गावात एकही नाही, हे बबन्याचं खरं दुःख होतं. (आता कळलं ना, बबन्या बांगरवाडीला भंगारवाडी का म्हणायचा !) आता वरील कवितेत आपण महान असल्याचं बबन्यानं किती सूचकपणे आणि संगमाने प्रकट केले आहे ! पण हे बांगरवाडीच्या गावकऱ्यांना कुठले कळायला?

बबन्या गवते येतो म्हटलं की बांगरवाडीच्या धिप्पाड पाटलाचीच नव्हे, तर सगळ्यांचीच पळता भुई थोडी व्हायची. खरं तर बबन्या काही गावातल्या मस्तीरामसारखा दादा नव्हता, की न्हाव्यासारखा आमदाराच्या पी.ए. च्या मावस भावाच्या भाच्याचा चमचाही नव्हता. बबन्याची साऱ्यांना भीती वाटायची असही नाही, पण त्याच्यापासून सगळे दूर पळायचे एवढं मात्र खरं! शहरातल्या पाव्हण्यानं बूट काढल्यावर मोज्याला येतो, तसा वास बबन्याच्या अंगाला येतो. एवढचं त्याचं कारण नव्हतं. बांगरवाडीच्या गावकऱ्यांना काडीमुड्या अंगाच्या बबन्याची, नव्हे तर त्याच्या मेंदूला झिणझिण्या आणणाऱ्या कवितांची भीती वाटे. वास्तविक पाहता बबन्यालाच खरी भीती वाटायला हवी. कारण त्याच्या कवितांमुळे एखाद्याच्या मेंदूला झिणझिण्या येण्याऐवजी त्या मेंदूत बबन्याच्या कानशिलाखाली झिणझिण्या आणण्याची आयडीया आली, तर बबन्याची काही धडगत नव्हती. पण या वाळलेल्या काटकीसारख्या पोराला कानसुलात लगावल्याने भलतच काही झालं, तर आपल्यावर बला नको या (सत्) विचाराने गावकरी बबन्यावर कधी हात उगारीत नसत.

बबन्या गवतेच्या डायरीतली पहिली काही पाने पाहिली की, त्याची महानता झेंडूच्या फुलासारखी चटकन नजरेत भरते. ही पहा ती पानं –

बबन्या दगडू गवते

मु.पो. बांगरवाडी

बऱ्याच दिवसांनी दिसलीस तू

बहुत दिनांनी भेटलीस तू

न्यारा आनंद तुजला पाहूनी

ग सखे मज तुजला पाहूनी

वसंत ऋतू जणू मनी बहरला

तेवढ्यात तुझा बा आला

बबन्या गवते यांच्या

सुंदर लघुकवितांचा संग्रह

आणि

बबन्या गवते यांच्या विचारांचे मोती

तसेच

बबन्या गवते यांना आलेले कठोर जगाचे कठोर अनुभव.

**डायरीचे पहिले पान** :

संदू शिंप्याने यमीला जन्माला घालण्याव्यतिरिक्त एक तरी चांगले काम या जगात केले आहे काय? अन्यथा मी यमीकडे बघत असता डोळे वटारण्याऐवजी आपले लक्ष नाही, असे दाखवून तो निघून गेला नसता काय? ... पण सिनेमातल्या प्रेम चोप्रासारखाच नेहमीच नायकाच्या वाटेत आडवा येतो.

लघु कविता क्र. १

|| बा तुझा नव्हे सखे हा, मूर्तीमंत चोप्रांचा प्रेम हा,

यमी तू, बबन्या मी, तुजसंगे थंड वाटे उन्हातही गर्मी,

गटारात पाणी तुंबे जैसे, मनात माझ्या प्रेम भरे तैसे,

चकवून बा चा चकणा डोळा, पडशील कधी तू माझ्या गळा ||

तर अशा या बबन्यानं जीव द्यायचा ठरवलं, तेव्हा जीव देण्यासाठी त्याच्याकडे एक नाही, दोन नाही, तर चक्क साडेपाच कारणं होती. आपल्या मोलाचा जीव देण्याचा कटू निर्णय घेतला होता. त्याच्या डायरीतल्या एकशे एकोणपन्नासाव्या पानावर त्याने ही साडेपाच कारणं लिहून काढली होती, आणि आता जीव देण्यापूर्वी शेवटचं एकदा वाचायचं म्हणून भोवती गुणगुणणाऱ्या

डासांची पर्वा न करता तो दिवा जाळीत ऐन मध्यरात्री बसला होता. त्याची नजर डायरीच्या पानावरुन फिरू लागली.

<u>'जय श्री कवितामाता'</u>

मी, बबन्या दगडू गवते, राहणार बांगरवाडी, या कठोर जगाच्या कठोर अनुभवांनी त्रासलो आहे. सबब, मी माझा जीव देण्याचा कठोर निर्णय कठोर मनाने घेतला आहे. (रानबोके मास्तरांना माझ्या या निर्णयाने आनंद होईल, याची मला कल्पना आहे, पण इलाज नाही) या निर्णयाप्रत येण्याची कारणे खालीलप्रमाणे :

पहिले कारण :- मी कवी आहे, हा या निष्ठूर जगात गुन्हा समजला जातो.

दुसरे कारण :- सदू शिंप्याच्या यमीने माझ्याकडे पाहून डोळा मारला, म्हणून सदू माझ्यावर लत्ताप्रहार करुन, हे निर्दय जग माझ्यासारख्या कोमल हृदयी माणसाला राहण्याच्या लायकीचे नाही हे सिद्ध केले.

तिसरे कारण :- सदू मला मारत होता, तेव्हा यमी फिदीफिदी हासत होती.

चवथे कारण :- रानबोके मास्तरांना माझ्या कविता ऐकण्यापेक्षा मी त्यांच्या घरातून बाहेर पडताना त्यांच्या चपला घालून तर बाहेर पडत नाही ना, हे पाहण्यात जास्त इंटरेस्ट आहे. गावातल्या उनाड पोराटोरांना दिवसभर कंट्रोल करणाऱ्या रानबोकेसारख्या सहनशील मास्तरांच्या या उदाहरणावरून माझी खरीखुरी पात्रता ओळखणारी माणसं या जगात नाहीत, अशी माझी खात्री झाली आहे.

पाचवे कारण :- यमीच्या मनात माझ्याबद्दल प्रेम नसून ती माझी चेष्टाच करते, हे पुन्हा एकदा कालच माझ्या लक्षात आले.

साडेपाचावे कारण :- सगळ्या पुढाऱ्यांप्रमाणे माझं मोठेपण मी मेल्यावर तरी गावकऱ्यांच्या लक्षात येईल.

सहाव्या क्रमांकाच्या कारणाला आपण साडेपाचावे कारण का म्हटले, हे अज्ञानी वाचकांना ध्यानात येणार नाही, म्हणून बबन्याने त्याखाली, 'गावकऱ्यांच्या कुवतीबद्दल मला शंका असल्याने, खरे म्हणजे त्यांच्यात कुवत नसल्याबद्दल मला खात्री असल्याने मी मेल्यावर सुध्दा त्यांना माझे मोठेपण कळेलच, असे मला वाटत नाही.' अशी एक तळटीपही आपल्या मिचमिच्या अक्षरात लिहून ठेवली होती.

आपण जीव देण्याची कारणं डायरीच्या ज्या पानावर लिहिली. त्या पानाचा क्रमांक एकशे एकोणपन्नास आहे, या योगायोगाचे बबन्याला नवल वाटले. त्याच्या बालपणीच्या स्मृती जाग्या झाल्या. एकावर दोन शून्य या आकड्याला 'शंभर' आणि 'एकशे' अशी दोन नावे कशी, हे त्याला इयत्ता पाचवी 'ड' मध्ये तिसऱ्यांदा बसावे लागले तरी ध्यानात आले नव्हते. एखाद्या आकड्यामागे शून्य लावले तर खिशात खुळखुळ गोट्या असणाऱ्या पोऱ्याला इतर पोरांकडून दिले जाते तितके महत्व असते, ही वस्तुस्थिती अखेर त्यांने आपल्या बालमनाला समजावली होती, आणि एकोणपन्नास हा आकडा तर तो जन्मात कधी विसरणे शक्य नव्हते. रानबोके मास्तरांनी पन्नास

उठाबशा काढायला सांगितल्यानंतर त्यांचा डोळा चुकवून आपण एकोणपन्नासच उठाबशा कशा काढल्या, हा किस्सा त्याने आपल्या शौर्याचे प्रतिक म्हणून अनेकदा आपल्या वर्गमित्रांना सांगितला होता.

मरणाला सामोरे जाताना आपण मनात कोणताही विचार ठेवायचा नाही, असे बबन्याने ठरवले आणि हा योगायोगाचा विचार ताटातल्या नको असलेल्या पदार्थाचा त्याने बाजूला सारला. डायरी टेबलवर ठेवून तो क्षणभर शांत उभा राहिला. स्वतःला सध्या काय वाटते आहे, तेच कळेना. न राहवून त्याने पेन उचलला आणि आपली अवस्था शब्दांमध्ये बांधून टाकली.

‘मी म्हणजे जणू रेशनदुकानदार

माझे मन जणू

त्याचा रॉकेलचा पिंप!

रॉकेलने भरलेला

पण दुकानाबाहेरच्या रांगेतल्या लोकांसाठी

रिकामा असलेला ||

माझे मन जणू रॉकेलचा पिंप

भरलेला, तरीही रिकामा असलेला |’

ही कविता लिहिल्यावर बबन्याला मोकळे वाटले. आता तो गंभीरपणे जीव कसा द्यायचा, याचा विचार करू लागला.

आत्महत्या करण्याची नेहमीची यशस्वी पद्धत म्हणजे गळफास घेणे! आपण गळफास घ्यावा … बबन्याने विचार केला. ‘नको SSS त्याच्या दुसऱ्या मनाने त्याला दाबले. “ आपल्याकडचा स्टूल म्हणजे लंगडा बाळकृष्ण आहे. त्याच्या डुगडुगत्या तीन पायापैकी एकाने जरी असहकार पुकारला, तरी जीव जाणे राहील बाजूला, आणि बत्तीशी मात्र नक्कीच गमवावी लागेल….” मरायला अगदी थोडा अवधी राहिला असला, तरी तेवढ्या काळात आयुष्यभर साथ केलेल्या बत्तीशीला गमावण्याची आयडिया बबन्याला मुळीच पसंत नव्हती. म्हणून त्याने अंगावर चढलेल्या झुरळासारखा गळफास घेण्याचा बेत मनातून झटकून टाकला.

गळफासानंतर सहजी आठवणारा मार्ग विष घेण्याचा! बबन्या स्वतःवरच खुष झाला. विष घेतले म्हणजे साली कसलीच कटकट नाही. उन्हातून आल्यावर उसाच्या रसाचा ग्लास तोंडाला लावतो, तसं घटाघटा विष पिऊन टाकलं की प्रश्न मिटला. टाचा उंचावून छाताला दोरी बांधायचा त्रास नाही, की लंगड्या स्टुलावर अवलंबून राहण्याची ‘रिस्क’ नाही. आपलं आपण गुपचूप विष पिऊन आडवं झालं की, खेळ खल्लास? विष पिऊन आपण छानपैकी मरुन पडलो आहोत, आणि यमी आपल्यासाठी धायमोकलून रडते आहे, सदू शिंप्याला आपल्या खलनायकी वागण्याचा पश्चाताप झाला आहे, रानबोके मास्तर आपण या महान कवीला ओळखू शकलो नाही, म्हणून

स्वतःलाच शिव्याशाप देत आहेत. अशी एक ना दोन अनेक सुखद दृश्ये बबन्याच्या डोळ्यापुढून तरळून गेली.

महान माणसांना साध्या साध्या गोष्टींसाठीही अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. विष घेऊन मरण्याची आयडिया आणण्यामधल्या अनेक व्यावहारिक अडचणी बबन्याला भेडसावू लागल्या. 'अहो एक विषाची बाटली द्या हो,' असे दुकानदाराला म्हटल्यावर तो नक्की काय देईल? जे देईल ते खरोखरच विष असेल का? विषाची परीक्षा आपण कशी पाहायची? विषाची चव कडू कारल्यासारखी असेल तर आपल्याच्याने ते घेववेल काय? विषाऐवजी भलतेच औषध पोटात गेले आणि पोट दुखू लागले, तर काय करायचे? विषाची चव न आवडल्यास काय करणार? विष घेऊन पाहिल्याशिवाय त्याच चव आवडणारी आहे की न आवडणारी आहे, हे कसे कळणार? विष घेऊन यशस्वी आत्महत्या केलेल्यांपैकी नक्की कोणाचा अनुभव आपल्याला उपयोगी पडेल? ---- अशा एक ना दोन, अनंत व्यावहारिक अडचणींनी बबन्याला घेरले, आणि नकोच ते विषाचे लचांड! या निष्कर्षावर बबन्या पोहोचला.

बबन्या आता जरा विचारातच पडला. जीव देण्याचा मार्ग विचार करुनच निवडला पाहिजे, घाई उपयोगाची नाही, असे त्याने स्वतःच्या मनाला बजावले. अस्वस्थता दूर करण्यासाठी तो जरा अंमळ बसला. मनातला गोंधळ दूर करण्यासाठी काय करावे याचा विचार करू लागला. कवी लोक स्वतःच्या अनुभंवावर कविता करतात, हे त्याने ऐकले होते. त्याचा पुढच्या कवींना फायदा होतो, हेही त्याला ऐकून माहित होते. आपल्या आत्ताच्या अनुभवाचा पुढच्या कवींना फायदा व्हायलाच हवा, असे बबन्याला मनापासून वाटू लागले, त्याने डायरी आणि पेन पुढे ओढले. पण काही सुचेना, शब्द आठवेनात काही तरी लिहायचेच या ईर्षेने बबन्या शब्दांची धरपकड आणि खेचाखेच करू लागला.

"असाच एकदा मज"

जीवाचा आला कंटाळा ! ---

बराच वेळ प्रयत्न करुनही बबन्याला पुढची ओळ सुचेना. विशेषतः शेवटी 'ळा' असलेले शब्दच त्याला आठवेनात. कावळा, काळा, तिरळा, बगळा, सगळा, वेगळा, मोकळा, वडाळा, वाटोळा यातला कुठलाच शब्द त्याला पुढच्या ओळीसाठी योग्य वाटेना. अखेर ॲडजस्टमेन्ट म्हणून 'असाच एकदा मज जिवाचा कंटाळा आला', अशी त्याने पहिली ओळ बदलून पाहिली. पण ही सरळ सरळ धड्यातील ओळ झाली, कवितेत ती शोभणार नाही, हे चाणाक्ष बबन्याच्या लगेच ध्यानात आले, आणि त्याने पूर्वीचीच ओळ कायम ठेवली.

आकाशात लखकन वीज चमकावी, तसा बबन्याला 'बावळा' हा शब्द आठवला आणि झरकन त्याने पुढची ओळ लिहून टाकली,

"कसा जीवन द्यावा'

विचाराने झालो बावळा ||"

मात्र यापुढे काही केल्या बबन्याला लिहिणे जमेना.  विष आणि गळफास हे दोन्ही शब्द यमक जोडण्याच्या दृष्टीने उपयोगाचे नाहीत,  हे निरीक्षण नोंदवून ठेवायला मात्र बबन्या विसरला नाही.

'विष' आणि 'गळफास' हे दोन्ही पर्याय रद्द झाल्यावर नदीत किंवा विहिरीत उडी टाकणे हा सोपा मार्ग बबन्याला आठवला.  पण आपल्याला पोहता येत नाही आणि लहानपणापासूनच पाण्याची भीती वाटते, तसेच उन्हाळा असल्याने  पाणीच नसले तर नुसतेच खडकावर आपटण्याची शक्यता, या कारणांमुळे बबन्याने तो मार्ग लगेचच मनातून काढून टाकला.

आता मात्र बबन्या वैतागला.  साधा जीव द्यायचा म्हटला तर एवढी कटकट असते? अरे त्यापेक्षा जगणं बरं! -- हा विचार मनात आल्याबरोबर बबन्याला  स्वतःचीच लाज वाटली.   केल्या निश्चयापासून वाट्टेल ते झाले,  तरी ढळायचे नाही, असे त्याने पक्के ठरवले.

बराच वेळ डोकं खाजवून देखील आपल्याला जीव देण्याचा चांगलासा मार्ग सुचत नाहीये आणि डोकं खाजवल्याने त्यातल्या उवाही कमी होत नाही, हे लक्षात आल्यावर बबन्याने खोलीबाहेर पडण्याचा निर्णय घेतला.   'बाहेर  तर पडू.  मग करु सुचेल तसं ...' असं स्वतःशीच पुटपुटत बबन्यानं खोलीचं दार उघडलं.

बाहेरच्या मिट्ट काळोखाची बबन्याला नाही म्हटले तरी थोडी भीती वाटलीच. कुठून तरी कुत्र्याचं विव्हळणं ऐकू आलं, आणि बबन्याला वातावरण आणखीनच भयाण वाटू लागलं.  तरी हिंमत करून त्याने एक पाऊल दाराबाहेर टाकलं ना टाकलं तोच शेजारच्या झुडूपातून काहीतरी सळसळत गेल्याचा आवाज झाला.  बबन्याने बाहेर टाकलेला पाय अभावितपणे आत घेतला.  घशात आलेला आवंढा गिळला आणि धाडकन दार लावलं. तेव्हा कुठे बबन्याला सुरक्षित वाटलं.  'छे!  रात्री घराबाहेर जाऊन जीव देण्यात काही अर्थ नाही.  अंधारात कुठं जीव-जिवाणू सळसळत, तर कुठं कुत्रच व्हिवळतं आणि अंधारात कुठल्या खड्ड्यात पाय पडून पाय मुरगळला तर ...?' बबन्याच्या या विचारचक्राचा अंत 'रात्री घराबाहेर जीव देण्यासाठी म्हणून जाऊ नये,' या मुक्कामावर आला.

जीव कसा द्यायचा याचा विचार करून-करून त्रासलेल्या त्या थकल्या-भागल्या जीवाने अखेर डोळे मिटून एक डुलकी काढायचे ठरवले.

दुसऱ्या दिवशी बबन्याच्या डायरीत खालील नोंद झाली.

" जगण्यापेक्षा जीव देणे सोपे वाटले, तरी प्रत्यक्षात जगण्यापेक्षा जीव देणे अवघड आहे.  माझी जीव देण्यामागची कारणं पाहता त्याच्यापेक्षा जीव देण्याचा मार्ग निवडणं अधिक अवघड आहे,  असे माझ्या लक्षात आल्याने मी जीव देण्याचा माझा निर्णय रद्द करीत आहे. "

( या माझ्या निर्णयाने रानबोके मास्तरांना वाईट वाटेल, याचा मला आनंद होत आहे. )"

- किरण कुलकर्णी